बुधवार, दि. 1 जून 2011
CITY न्यूज़ एक्स्प्रेस | Views

इंटरव्ह्यू ऑफ द डे

# पर्यावरणात सामान्यांचा सहभाग हवा



प्रियानंद आगळे

**पर्यावरणाच्या संरक्षणासाठी काम करणारे शहरातील तरुण पर्यावरणप्रेमी प्रियानंद आगळे यांच्याशी बातचीत**

तुम्ही सामाजिक, आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात काम करीत असाल तर **शिवाजी कदम** (मो. ८०८७८८९५५४) यांच्याशी संपर्क साधा.

**आपले शिक्षण कोठे झाले?**

वैजापूर तालुक्यातील परसोडा येथे माझे प्राथमिक शिक्षण झाले. पुढील शिक्षणासाठी मला औरंगाबादला यावे लागले. आणि औरंगाबादलाच अभियांत्रिकीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

**पर्यावरणासाठी काम करावे असे का वाटले?**

माझे प्राथमिक शिक्षण खेडेगावात झालेले असल्याने मला नदीकाठी फिरण्याची आवड होती. औरंगाबादला शिक्षणासाठी आल्यानंतर बेगमपुरा परिसरात मी राहत होतो. मला शाळेत जाताना खाम नदी ओलांडून जावे लागत होते. मात्र, नदीची अवस्था खराब असल्याने परिसरात जावे कसे? असा प्रश्न माझ्यासमोर पडला होता. त्या दिवसापासून खाम नदीच्या स्वच्छतेसाठी काम करण्याचा वसा घेतला आणि कामाला लागलो.

**खाम नदीच्या स्वच्छतेसाठी कोणते प्रयत्न होणे आवश्यक आहे?**

औरंगाबाद शहराची लोकसंख्या वाढत असल्याने शहराच्या गरजा वाढत आहेत. त्यामुळे ड्रेनेजचे पाणी थेट खामनदीत सोडण्यात येत असल्याने नदी दूषित होत आहे. कोणतेही सामाजिक काम हाती घेतल्यानंतर त्या कामात लोकसहभाग महत्त्वाचा आहे. खाम नदीच्या स्वच्छतेसाठी स्थानिक नागरिकांनी पुढे यावे, असे मला वाटते.

**औरंगाबादचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी कोणते प्रयत्न होणे आवश्यक आहे?**

औरंगाबाद शहराच्या पाणीपुरवठ्याचा एकमेव स्रोत म्हणून जायकवाडी धरणाकडे बघितले जाते. मात्र, औरंगाबाद शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या पाण्याच्या स्रोतांचा अभ्यास करून पाण्याचे नियोजन केल्यास औरंगाबाद शहराचा पाणीप्रश्न दूर होऊ शकतो. नहर- ए- अंबरी, हर्सूल तलावात येणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे.

**कोणत्या संस्थेच्या माध्यमातून आपण कार्य करता?**

अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर काही मित्रांना सोबत घेऊन इको नीडस् फाऊंडेशन ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत पर्यावरणासाठी अनेक सामाजिक कामे करण्यात येत आहेत. गोदावरी नदीला धोका निर्माण करणाऱ्या घटकांचा अभ्यास करून त्याचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. पाणी बचाव अभियान, औरंगाबाद जलस्रोत वाचवा अभियान यासारख्या अनेक पर्यावरण संरक्षणाच्या अभियानात सहभाग घेतला आहे.